**दिनांक १४.०८.२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभेचे इतिवृत्त.**

दिनांक १४.०८.२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथील सभागृहात दूपारी ०४.०० वाजता अध्यक्षतेखाली **जिल्हा निर्यात प्रचलन** समिती सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेत खालील प्रमाणे अधिकारी व औद्योगीक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

1. मा. श्री. योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.)जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती, भंडारा.
2. श्री. एच. के. बदर — महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा
3. सौ. स्नेहल ढोके — सहाय्यक, DGFT, नागपूर (On line participated)
4. श्री. एस. आर.झलके — कौशल्यविकासअधिकारी, भंडारा.
5. श्री. हर्षवर्धन हरडे — व्यवस्थापकीय संचालक, भंडारा राईस क्लस्टर.
6. श्री. अमितकुमारसिंग — प्रर्वतक, MOIL भंडारा
7. श्री. धनोष खोत — व्यवस्थापक, माईल, डोंगरी बुजरुक
8. श्री. राकेशवाघाये — प्रतिनिधी, MMPL, भंडारा
9. श्री. एन.डी.गीरी — क्षेत्र व्यवस्थापक, MIDC
10. श्री. गणेश तईकर — जिल्हा अग्रणी व्यवस्थापक.
11. श्री. ए.एच. रामटेके — प्रतिनिधी, कृषिविभाग, भंडारा
12. श्री. डी. एच. चांदणे — प्रतिनिधी, MIDC नागपूर

व स्वाक्षरी नोंदवही नुसार उपस्थित ईतर अधिकारी / सदस्य

सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा यांनी सर्व उपस्थित सभासद / सदस्य / पदाधिकारी व अधिका-यांचे स्वागत केले व मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती भंडारा यांचे परवानगीने सभेस सुरवात केली.

| अ. क्र | चर्चेसाठी सादर विषय / मुद्या | समिती सभेत अध्यक्षांनी दिलेले निर्देश | जबाबदार अधिकारी | अनुपालन पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत सुविधा केंद्राची स्थापना करणे.<br>तसेच निर्यातीकरीता जिल्हयातिल उत्पादनांना **G.I. Tag** मानांकन प्राप्त करूनघेणे | सदरसभेत G.I. Tag तांत्रिक कारणांमुळे अजून प्राप्त झालेला नाही. अधिक्षकीय कृषिअधिकारी यांनी G.I. Tag प्राप्त करून घेणेकरीता पाठपुरावा करून अहवाल सादर करावा असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले होते परंतू अधिक्षकीय कृषिअधिकारी सभेत उपस्थित नसल्यामुळे प्रगती कळू शकली नाही तेव्हा त्यांचे प्रतिनिधींना सदर विषयावर झालेली प्रगती तातडीने सादर करण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले. | अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा. | |
| 2. | Preparation and monitoring implementation of district export plans for Minerals | खनिज (Mineral Ore) निर्याती बाबत MOILयांचे कडून खनिज प्रक्रिया उद्योगांना चालना मिळण्याबाबत तसेच जिल्हयातील उद्योजकांना यावर अवलंबून असलेले उद्योग सुरू करता येईल याकरीता त्यांचे सभा घेऊन अहवाल सादर करण्याची सुचना MOIL चे | MOIL / महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिका-यांना मा. अध्यक्षांनी दिली होती परंतू त्याबाबत अजून अहवाल प्राप्त झाला नसल्यामुळे Ancillary units सुरू करण्याबाबत माहीती कळू शकली नाही तेव्हा महाव्यवस्थापक यांना स्वत: डोंगरी माईन व चिखला माईन यांचे पदाधिका-याशी प्रत्यक्ष संवाद साधुन व लक्ष घालुन, प्रगती सभेस सादर करण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले. | | |
| 3. | Export Outreach Programme. | DGFT च्याअधिकारीसौ. स्नेहल ढोके,सहाय्यक, DGFT, नागपूर (On line participated)यांनी जिल्हयातील निर्यात वाढ होणे करीता, दिनांक 22/08/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता भंडारा येथे DGFT व्दारे Export Outreach Programme चे आयोजन करण्यात येणार सदर कार्यक्रमात निर्यातदार नोंदणी, निर्यात प्रकिया, शासनाच्या निर्यात प्रोत्साहन संबधित योजना याविषयी मार्गदर्शन करण्यात असल्याचे सांगितले. तसेच वनपर्यटना विषयी सुध्दा यात मार्गदर्शन करण्यातअसल्याचे सांगितले. मा. अध्यक्षांनी जिल्हयातील उत्पादक / निर्यातदार, FPO, वनपर्यटना संबधित व्यवसायीक ईत्यादींना कार्यक्रमात सहभागी होण्याचे दृष्टीने कळविण्याविषयी वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्याच्या सुचना दिल्यात | अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा./ प्रकल्पसंचालक, आत्मा / उपवनसंरक्षक, भंडारा/ माविम / महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. | |
| 4. | निर्यातीकरीता Cooling Container उपलब्धते बाबत. / निर्यात विषयी जनजागृती कार्यक्रम | Cooling Container उपलब्धते बाबत मागणी किंवा कुठलाही Feedback आलेला नाही असे सभेत सांगण्यात आले.<br>नागपूर मध्ये SPV करीता कार्यक्रम घेण्यातआलाअसे DGFTच्या अधिकारी सौ. स्नेहल ढोके,सहाय्यक, DGFT, नागपूर (On line participated)यांनीसांगीतले<br>जसे नागपूरमध्ये SPV साठी कार्यक्रम घेण्यात आला तसे भंडारा SPV करीता घेता येईल कायहे जाणून घ्यावे. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. / राईस मिलर्स असोसिएशन / DSO. | |
| 5. | कृषिक्षेत्राशी निगडीत मुद्दे : अपुरी साठवणुक व पायाभुत सुविधा | 2000 टन क्षमतेचे धान्य साठविण्यासाठी गोदाम व शीतगृह तयार करणे<br><br>सदर संबंधात बुलढाणा अर्बन बँक मदत करण्यास तयार आहे असे श्री हर्षवर्धन हरडे यांनी अध्यक्षांना सांगीतले तेव्हा यावर गोदाम व शीतगृह तयार करणे यात कोण उत्सुक आहेत ते बघावे जेणेकरून शेतक-यांना यात मदत होईल असे अध्यक्षांनी सांगीतले याकरीता सदर संबंधात बुलढाणा अर्बन बँके सोबत Short Video Conference घेण्याची सुचना अध्यक्षांनी केली. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. / राईस मिलर्स असोसिएशन / अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा./ प्रकल्प संचालक, आत्मा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6. | निर्याती संबधी चर्चिलेले ईतर मुद्दे / ब्रँडीग व पॅकेजिंग | जिल्हयातील ODOP अंतर्गत तांदूळ उत्पादनाचे प्रसिदधीसाठी, K.V.K. कडे ब्रँडीग व पॅकेजिंग विषयी तद्य व्यक्ती आहेत काय हे जाणून घ्यावे. तसेच IIM नागपूरला ब्रँडीग व पॅकेजिंग करीता मार्गदर्शमा करीता संपर्क साधावा. Finished Product चे प्रसिदधीकरीता निमंत्रितांचे स्वागत करायला Indian Institute of Packaging कडून माहीती घ्यावी तसेच याबाबत वर्धा जिल्यात याची संकल्पना व कार्यपध्दती आहे याचा अभ्यास करावाअसे निर्देश देण्यातआले. | जिल्हा पुरवठा अधिकारी/ राईस मिलर्स समुह / अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा./ प्रकल्प संचालक, आत्मा | |

उपरोक्त प्रमाणे पुढील सभेत सर्व मुद्यांवर कार्यवाही करण्याचे सुचनांसह उपस्थित राहण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले. यानंतर सर्वांचे आभार मानुन सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक यांनी अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

मा. जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचलन समिती,
जिल्हा भंडारा